# नियमित दिवाणी दावा क्र. ३७०/२०२१ मधील नि. २९७ खालील आदेश

विठ्ठल खटके व १ वि. छबुताई कांबळे व इतर ५७

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १क, २क, ६उ, ८,१०, ११, २२,४५, ४६, ५१ ते ५४ व ५६ यांना समन्सची बजावणी जाहिर नोटीसीद्वारे होणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादींच्या म्हणण्यानुसार वर नमुद प्रतिवादींना बेलिफ मार्फत समन्सची व नोटीसीची बजावणी झाली नाही. करिता वादी यांनी आरपीएडीने वर नमुद प्रतिवादींना समन्स व नोटीसची बजावणीकामी अर्ज दिला होता. परंतु तरीही पत्ता बदलला आहे, नाव कोणी कबुल करत नाही अशा शे-याने समन्स व नोटीस परत आली आहे. तसेच सदर प्रतिवादींना काढण्यात आलेले समन्स व नोटीसा या अपूर्ण पत्ता, जवळपासची ठळक खूण नसल्याने माहिती मिळत नाही, बारामती येथे रहातात, पुणे येथे रहातात, दिलेल्या पत्त्यावर रहात नाहीत, कोठेही आढळ न झाल्याने, सदर मालक परगावी पत्ता भेटत नाही, ठिकठिकाणी जावून तपास करता सदर गावामध्ये रहात असल्याबद्दल खात्रीशिर माहिती मिळत नाही अशा विविध शे-याने परत येत आहेत. त्यामुळे सदर वर नमुद प्रतिवादींना जाहिर नोटीस काढणे आवश्यक झाले आहे. करिता वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुद्ध विशेष दिवाणी दावा क्र. १८०/२००८ मधील हुकुमनामा बंधनकारक नाही व निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे वर नमुद प्रतिवादींना नोटीस व समन्सची बजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ नि. २९८ वर त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

अ. अर्ज निशाणी क्र. २९७ मंजुर करण्यात येतो.

ब. प्रतिवादी क्र. १क, २क, ६उ, ८,१०, ११, २२,४५, ४६, ५१ ते ५४ व ५६ यांना त्यांच्या रहात्या परिसरात प्रसिद्ध होणा-या स्थानिक वृत्तपत्रात जाहिर नोटीसीद्वारे समन्सची बजावणी करण्यात यावी.

VARSHA BALVANTRAO PATIL

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2026.03.16 13:14:33 +0500

**दिनांक – १६/०३/२०२६** **(वर्षा बी. पाटील)**

**३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बारामती**